
साहित्य प्रतिष्ठान®

# अंतरीच्या गूढगर्भी



लेखक : संकल्प आभाळे

# अंतरीच्या गूढगर्भी

## संकल्प आभाळे

## ई साहित्य प्रतिष्ठान

पुस्तकाचे नांव: **अंतरीच्या गूढगर्भी**

प्रकार : कथा

लेखक : संकल्प आभाळे


संकल्प आभाळे,

१५/ब अक्षय पॅलेस

वारजे,

पुणे ५८.

abhalesd@gmail.com

९०२८७५२७३४


मुखपृष्ठ. अंतर्गत सजावट :

योगेश ठीक


प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान®

esahity@gmail.com

www.esahity.com


©esahity Pratishthan® 2013



• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
• या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा नाटक, सिनेमा, सिरियल, स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान ही कवी, लेखक व वाचकांनी मिळून चालवलेली चळवळ आहे. नवीन उदयोन्मुख लेखकांसाठी हे व्यासपीठ आहे, आणि खेडोपाडी व देशोदेशी पसरलेल्या मराठी वाचकांसाठी वाचनाचे साधन आहे. ई पुस्तके. आता स्मार्टफ़ोनवर डाऊनलोड करून वाचता येतात. आपण या चळवळीचे भाग होऊ शकता. आपल्या ओळखीच्या लोकांचे ई मेल पत्ते पाठवा. त्यांनाही विनामूल्य ई पुस्तके पाठवू. नवीन वाचक आणि नवीन लेखकांचे या चळवळीत स्वागत आहे

# अर्पणपत्रिका

ज्या कलामंडळाने
माझ्यातल्या या कलेला प्रेरणा दिली,
माझ्यातल्या लेखकाला नेहमी प्रोत्साहन दिले.
माझ्यावर मनापासून प्रेम केले
त्या मुक्कामपोस्ट पुणे
या कलामंडळास
प्रेमपूर्वक
अर्पण.

संकल्प आभाळे

या संग्रहातील सर्व कथा काल्पनिक असून त्यातील कोणत्याही व्यक्ती, प्रसंग किंवा स्थळे यांचा प्रत्यक्षाशी साम्य आढळले तर तो निव्वळ योगायोग समजावा.

# शुभेच्छा

**--संदीप खरे**

संकल्पच्या कथा या जगण्याला संवेदनशील हातांनी स्पर्श करणाऱ्या कथा आहेत! आयुष्यातल्या बारीकसारीक घडामोडींचा, नातेसंबंधांचा, अनुभवांचा त्या वेध घेऊ बघतात. लिखाणात नवखेपणा अजूनही काही सांगण्याची प्रांजळ असोशी यात जाणवते. लेखनाच्या वाटेवर त्याचं हे पहिलंच पाऊल आहे. आयुष्याकडे उघड्या डोळ्यांनी आणि जिवंत मनाने पाहणाऱ्या संकल्पच्या कथांना माझ्या अनेकानेक शुभेच्छा!

(संदीप खरे)

लेखकाचं मनोगत

आपण केलेलं लिखाण आपल्याला एखाद्या मोठ्या दु:खातून सावरेल अस कधीच वाटलं नव्हत. पण आज जेव्हा हे पुस्तक हाती येतंय तेव्हा कळतंय या पुस्तकाने आपल्याला किती मोठ्या दु:खातून बाहेर काढलंय. शाळेत कधीतरी सातवी आठवीत असताना पहिली कविता लिहली. पण ते म्हणजे अगदी असाच कंटाळा आलेला म्हणून. पण नंतर जसजशी मृत्युंजय सारखी  पुस्तक वाचनात येऊ लागली तसतसा या साहित्य क्षेत्राकडे आपोआपच ओढला गेलो. दहावीच्या सुट्टीत.

लिहिलेली स्वप्नांसाठीचा संसार ही माझी पहिली अप्रकाशित कादंबरी. त्यानंतर मग महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा, पथनाट्य स्पर्धायांच्यासाठी लिखाण केले. त्याला खूप छान प्रतिसाद मिळाला. त्यातूनच मग माझ्यातल्या लेखनाला प्रेरणा मिळत गेली.

अंतरीच्या गूढगर्भी हा कथासंग्रह म्हणजे तरुण मनाच्या भावनांचा सुप्त कल्लोळ आहे. प्रत्येकाच्या आयुष्यात अस एकतरी दु:ख असतंच जे कधीच कुणाला सांगता येत नाही. जीवनातल्या अश्याच अंतरातील काही कुरतडलेल्या धाग्यांचे दर्शन या पुस्तकातून करून देण्याचा प्रयत्न मी केला आहे. प्रत्येक कथा हि वेगळया वयातील व्यक्तींचे दु:ख आपल्या समोर मांडत असली तरी कथेतील पात्र दु:ख मनात खोलवर लपवून आयुष्य जगायला शिकवतात.

लेखक म्हणवून घेण्याइतका मोठा मी नक्कीच नाही. जे काही पाहिलं, जे काही अनुभवलं, ते शब्दातून मांडण्याचा प्रयत्न करतोय इतकंच. तसं पुस्तक वगैरे काढण्याचा विचार मनात अजिबात नव्हता. पण मध्यंतरी खूप जास्त जवळ असणाऱ्या व्यक्तीकडून खूप वाईट पद्धतीने फसवलो गेलो. अगदी कोसळून पडलो होतो. अशावेळी स्वतःच मन कुठतरी रमवण गरजेच होत. त्यातूनच मग पुस्तकाची कल्पना जन्माला आली.

मुक्काम पोस्ट पुणे या आमच्या कलामंडळातील अनेकांनी मग या पुस्तकाला आपलेसे मानून त्याच्या त्याला समर्पक रूप देण्यास खूप सहकार्य केले. हर्षद दुनाखे याने पुस्तकाला अतिशय समर्पक नाव सुचवले. सुरज भोगडे या मित्राने आपण पुस्तकाला अनुसरून लहान फिल्म्स बनवूयात अशी नवीन कल्पना समोर आणली आणि ती प्रत्यक्षात सुद्धा आणली. सर्वात महत्वाचं म्हणजे संदीप खरे यांनी नवोदित लेखक असून देखील पुस्तकाला मनापासून शुभेछा दिल्या. या सर्वांच सहकार्य होतं म्हणूनच हे पुस्तक तुमच्या समोर येऊ शकलं त्या सर्वांना मनापासून धन्यवाद.

पुस्तक आवडल तरी आणि नाही आवडल तरी प्रतिक्रिया पाठवायला विसरू नका.

आपला मित्र
संकल्प आभाळे

# अनुक्रम

बलात्कार

आदर्श चोर

अफेक्शन

पगार

पैलतीर

पाटी

दूर नभाच्या पल्याड

वेलॉरेन

शून्य

तुझ्याविना

बदल

दुनियादारी

मैत्र जीवांचे

# बलात्कार

दाभोलकर यांची हत्या. सकाळी सकाळी बातम्या चालू होत्या. बाजूलाच पुजारी कुंडल्या घेऊन बसले होते. ‘‘बाविसच गुण जुळतात लग्न कठीण जाईल’’ पुजाऱ्याने सांगितले आणि आता परत नवा मुलगा पाहावा लागणार याच टेन्शन काकूंच्या चेहऱ्यावर दाटून आलं. मला उगीच हसू येत होतं. खरं म्हणजे रोज नवीन नखरे करणारा माणूस खरंच 36 गुणांचा असू शकतो हेच मला पटत नव्हतं. बरं हे 36 गुण म्हणजे काय हे शोधण्याचा प्रयत्न पण केला मी. एकच माणूस समोर 36 वेगवेगळी माणसं आली कि 36 प्रकारे वागत असतो हे तर मी डोळ्याने पाहिलं होतं. त्यामुळे हि 36 गुणांची concept कोणत्याच ॲंगल मला पटत नव्हती. पण हि गोष्ट मी जरी 36 प्रकारे काकूला समजावायला गेलो असतो तरी ती ऐकणार नव्हती हे मला तेवढेच चांगले ठाऊक होते. त्यामुळे मी आपलं हसण्यावर समाधान मानून बाहेर आलो.

गुण जुळले कि दोघेही समजुतदारपणे राहतात असं म्हणतात. पण समजुतदारपणा हा एक गुण आहे आणि तेवढा असला कि सगळं तेवढंच सोप होऊन जातं हे का कळू नये या लोकांना. त्याला उगीच तामिळनाडून घालवलेले दिवस आठवले. कामानिमित्त पाठवलं होतं कंपनीने तिकडे. ट्रेन मधून उतरल्यापासून प्रत्येक गोष्ट तितकीच वेगळी होती. एक शब्द समजत नव्हता कोण काय बोलतंय. कोणतीच गोष्ट जुळत नव्हती. पण तरीही समजुन घेण्याचा प्रयत्न किती अप्रतिम होता. तिथल्या लोकांना काय बोलतोय आपण कळत नव्हतं तरीही अक्षरशः हातवारे करुन चेहऱ्यावरचे भाव बदलून समजून घेतच होतो ना एकमेकांना, कारण एकच होत इच्छा होती समजून घेण्याची. बास, ना कोणते गुण जुळत होते न राहणीमान. आईच्या पोटी जन्म घेताना किंवा वडिलांची निवड करताना कोणी बघत असेल का गुण जुळून? तरीही राहतोच ना आपण आयुष्यभरासाठी एकत्र. मग लग्न म्हणलं की का होतं

असं. लग्न सोडून बाकीची सारी नाती टिकतात, भावा– बहिणी पासून ते अगदी काका –काकूपर्यंत कधी गुण जुळवले आहेत असं मी पाहिलं नाही. पण ओढ नावाची गोष्ट टिकवतेच ना सारं. मग लग्न म्हणलं कि का येते हि गोष्ट. दोन भिन्न माणसं कितीही वेगळी असली तरी दोन वेगळ्या भाषेतल्या माणसांसारखी एकमेकांना समजून घेण्याची तयारी असली, विश्वास असला कि सगळं सहज सोपं होऊन जातं. मग दुसऱ्या गुणांची गरज तरी कशाला भासावी. कोणताच माणूस वाईट नसतो एवढी साधी गोष्ट जरी मनात बिंबवली तरी कितीतरी भांडणांची आणि प्रॉब्लेम्सची सोल्यूशन सहज मिळू शकतात आपल्याला. त्यासाठी मनापासून समोरच्या व्यक्तीवर प्रेम असायला हवं. कुणावर प्रेम नसताना केवळ घरच्यांसाठी 36 गुण जुळतात म्हणून त्याचं मन राखण्यासाठी केलेलं लग्न म्हणजे स्वतः एवढीच आपण समोरच्याची फसवणूक करतोय असं नाही का? बलात्काराविरुध्द मोठ्या मोठ्याने आरोळ्या ठोकणाऱ्या लोकांना अशा समाजमान्य बलात्काराची गिनती कधी केली आहे का? कर्तव्य नावाच्या शब्दाखाली कितीतरी पालक आपल्या मुलाला अशी बाशिंग बांधून समाजात जेव्हा अभिमानानं मिरवतात तेव्हा त्या 'so called' 36 गुणांना सुध्दा लाज वाटत असावी. सगळेच गुण जुळले तर मग संथ पाण्यात नाव घेऊन जाण्यात मज्जा तरी कसली. समुद्राच्या उथळपणामुळेच तो त्याचं वेगळपण जपून आहे. नाहीतर त्यालाही मोठी नदी असंच कोणीतरी म्हणलं नसतं का?

विचारांची ही घालमेल त्याला अस्वस्थ करत होती उगीच. त्याने स्वतः कितीदा प्रयत्न केलेला गुण शोधण्याचा पण गेल्या अनेक वर्षात तो शोधू शकला नव्हता त्या गोष्टी पुजाऱ्याने क्षणात शोधाव्यात याचं त्याला थोडा आश्चर्यच वाटत होतं. लादेनला म्हणे 52 बायका होत्या. आता लादेनचे 36 गुण त्या बायक्यांसोबत जुळले असतील म्हणजे अरे बापरे. काय म्हणावं याला. सगळ्याच दृष्टीने विचार केला तरी शेवटी उत्तर शुन्यच येत होत. एका बाजूला जमाना सेरोगेसी पर्यंत पोहोचला आहे. एकमेकांना समोर येण्याची गरज नाही. जवळ येण्याची गरज नाही, तर दुसरीकडे मात्र स्वतःचे 36 गुण तपासून पाहण्यासाठी रांगाच्या रांगा वाढत आहेत. का? हा प्रश्न सगळ्यांच्या मनात आहेचं पण जोपर्यंत उत्तर मिळत नाही तोपर्यंत या रांगा वाढणारच आहे. कदाचित आपणही याचा

बळी ठरु असं त्याला उगीच वाटलं. म्हणून त्याने तिला फोन लावला आणि सांगितलं ‘ऐक. आपल्याला एक ब्राम्हण पण manage करावा लागणार आहे. आपले गुण व्यवस्थित जुळून देणारा. नाहीतर आपल्या दोघांवर सामाजिक बलात्कार झाल्याशिवाय राहणार नाही !!!

# आदर्श चोर

" बाबा दुधवाल्यानेच नेला असेल फोन तुमचा..." मुलाचे हे शब्द ऐकताच त्याने खणखणीत मुस्काटात वाजवली त्याच्या. मुलालाही बाबांच्या अशा वागण्याचं कारण कळेना. बाबांनी आतापर्यंत एवढं जोरात कधीच मारलं नव्हतं. मुलाच्या डोळ्यात खळकन पाणी आलं तो हुसमुसून रडू लागला. तेव्हा त्याला भान आलं आपण काही तरी चुकीची केलंय याची त्याला जाणीव झाली. त्याने मुलाला जवळ घेतल आणि सॉरी म्हणाला त्याला. पंधरा वर्षांपूर्वीचा तो प्रसंग त्याच्या डोळ्यांसमोर उभा राहिला...

सकाळी आईने धपाटे घालून उठवलं तेव्हा कुठे तो उठला. साडेसहा होऊन गेले होते. त्याने नेहमी प्रमाणे आळस दिला आणि दुधाची पिशवी भरु लागला. "आई काय ग..... झोपू देना" काय झोपू दे ?? आज बक्षीस समारंभ आहे विसरला का? बक्षीस मिळणार आहे ना आज.. जा लवकर दुध टाकून ये म्हणजे लवकर आवरुन जाता येईल तुला.

आईचे ते शब्द ऐकून झोपच उडाली त्याची. त्याने भरभर दुध भरलं आणि पिशवी सायकलला अडकवून तो निघाला. आज सगळ्यांसमोर बक्षीसाची..तो स्वतःलाच सांगत होता. एक एक पिशवी टाकत तो पुढच्या घराकडे जात होता. काहींच्या हातात तर काहींच्या दारावर अडकवलेल्या पिशवीत दुध टाकून पुढे निघत होता. आज काम थोडं चपळाईने चालू होतं त्याचं....सगळं दुध टाकून तो घरी आला.... आंघोळीच पाणी ओतून घेतलं आणि शाळेचे कपडे घालून निघाला शाळेकडे. इतक्यात एक इसम आला समोर त्याच्या. त्यांनी पाहिलं ते तर

जाधवकाका होते. ज्यांच्या घरी तो दुध टाकत होता. ते आले आणि एक सणसणीत मुस्काटात वाजवली त्याच्या. तो घाबरला काय झालं कळेना

"फोन दे माझा. चोरी करतोस घरातून फोन पळवतो...... लाज नाही वाटत"

" मी नाही घेतलाय फोन "

तो सांगत होता पण समोरचा इसम ऐकायलाच तयार नव्हता. त्याने अक्षरशः फरपटत घरी आणलं त्याला.लवकर सांग कुठेय फोन. तूच आला होतास घरी .. फक्त... तुमच्यासारखेच लोक चोरणार फोन.... लवकर सांग नाहीतर पोलीसांना बोलावतो.... असं म्हणत होते. आई पण कळवळून सांगत होती तो असं नाही करणार. पण ऐकायला तयारच नव्हता तो. बक्षीस समारंभाची वेळ झाली होती. तो मात्र शाळेत पोहोचला नव्हता. स्टेजवरुन नावाची घोषणा झाली. या वर्षीचा आदर्श विद्यार्थी पुरस्कार....... .. याने पटकावला आहे. गेली तीन वर्षे सतत हे बक्षीस मिळवले आहे. त्याची जिद्द चिकाटी याचा आदर्श घेत सर्वांनी त्याच्या प्रमाणे यश मिळवण्याचा प्रयत्न करावा. शाळेत त्याचे कौतुक होत होते तर इकडे पोलिस त्याला जंग जंग पछाडत होते. तो कळवळीने सांगत होता मी नाही घेतलाय फोन पण शेवटी कोणी ऐकतच नाही त्याचं .. शेवटी भिकारी म्हणून निघून गेला तो इसम...

तेव्हाच कळलं त्याला. माणसाला कधीच किंमत नसते.. किंमत असते त्याच्या प्रतिष्ठेला... माणूस माणसाला नेहमी त्याच्या कमाईवरुन ओळखतो. त्याचेही दोन चेहरे होते एक साध्या दुधवाल्याचा. आणि एक आदर्श विद्यार्थ्याचा. म्हणूनच कदाचित आदर्श विद्यार्थी पुरस्कार मिळताना. . चोरीचा आरोप त्याला सहन करावा लागला होता.. आतला खरा माणूस मात्र शेवटी अनोळखीच राहिला होता.

# अफेक्शन

सकाळपासून तो लॅपटॉप वर काहीतरी काम करत बसला होता. खरंतर कालच काम पूर्ण व्हायला हव होतं पण मधेच थोडे चेंज झाले आणि सगळ काम त्याला परत कराव लागलं. तो कामात एवढा व्यस्त होता कि आजूबाजूला त्याचं थोडंही लक्ष नव्हतं. बाहेर धो धो पाऊस सुरु झाला होता. घरासमोरचा बगीचा पाऊस पिऊन हिरवागार झाला होता. पण त्या दिवसानंतर पाऊस म्हणजे धो धो कोसळणार पाणी एवढाच राहिला होता त्याच्यासाठी मोबाईल मधलं संदीप सलिलच्या गाण्याचं फोल्डरसुध्दा त्या दिवसानंतर त्याने परत उघडलं नव्हत. नापीक झालेल्या जमिनीसारखी त्याच्या ह्रदयाची अवस्था झाली होती. इशा ने कागदाची मस्त एक बोट बनवली. दारासमोरुन वाहणाऱ्या पाण्यात ती सोडली. हळू हळू पुढे धावणाऱ्या होडीची ती बराच वेळ मजा पाहत बसली. बाबाला काम असलं कि बऱ्याचदा तिला एकट्याला बसायला लागायचं.. दमलेल्या बाबाची कहाणी ऐकल्यापासून तीनं कधीच या गोष्टीची तक्रार केली नव्हती बाबाकडे. पण अचानक आईची डायरी वाचायला मिळाली तिला. त्यात लिहल होत आज सकाळ पासूनच पाऊस भरुन आला होता. मोबाईल पाहते तर त्याचे 25 मिस्डकॉल होते. फोन लावला अगदी क्षणात त्याचे उचलला "पाच मिनिटात आवरुन चौकात ये मी येऊन थांबलोय.. आणि पाऊस ही." त्याच्या अशा बोलण्याचा मला राग यायचा कधीकधी... माझ्यापेक्षा हा पाऊस का आवडतो एवढा याला... मी आवरुन गेले मागे बसले आणि जणू काही आमच्यासाठीच थांबला होता असं वाटावं असा पाऊस सुरु झाला. मग त्या पावसावरच्या कितीतरी कविता त्याने ऐकवल्या.. त्याने म्हणणं चुकीच ठरेल थोडं... कारण त्याच्या दोन ओळी नंतर तो कधी कधी अडखळायचा आणि मग मला सुचलेली एखादी ओळ मी टाकून द्यायची तिथे. मधेच तो खूप रोमांटिक होऊन जायचा तिथलच झाडावरच कोणततरी फुल आणि ते नाही मिळाल तर एखादं पान घेऊन will you marry me असं म्हणत गुढग्यावर बसायचा. घरी कधी येणार म्हणला कि मात्र भिउन जायचा. तो

असा पाऊस एन्जॉय करायचा कि पावसाला ही बरसत रहावस वाटायचं.. तो टपरीवरचा कटिंग चहा.. इथ पर्यंतच वाचल होत इतक्यात बाबांनी जेवायला चल म्हणून आवाज दिला आणि मग पटकन डायरी तिथेच ठेऊन ती खाली आली होती. बाबा केवढा बदलला आहे ना. पण आज तिनं ठरवलं होत काही झाल तरी पावसात न्यायचं बाबाला, मनसोक्त भिजायचं.. ती आत आली आईच्या फोटोकडे एकदा पाहिलं.. ओढणी अगदी तिच्यासारखी केली बाबा समोर गेली आणि म्हणाली बाबा चला ना खेळायला पावसात. इशा मला काम करु दे.. आणि भिजली कि मग सर्दी होते मग शाळा बुडते.. टिचर ओरडतील ना.. नो नो असं म्हणत तो परत कामात बिझी झाला. ती थोडीशी हिरमुसली. मग एक डोक्यात आयडिया आली. तिचा मोबाईल घेऊन बाबाला मेसेज केला. ''दाराजवळ वाट पाहतेय मी तुझी आणि पाऊस ही.......लवकर येना बाबा.'' कामाच्या गडबडीत असताना त्याचा मोबाईल वाजला मेसेज वाचून तो एकदम शांत झाला... घोंगावणार त्याच्या कामाच वादळ एकदम थंड झाल. अशा ला कुठून कळालं. .. कस काय कळालं... पण आता ही उत्तर शोधण्यात अर्थ नव्हता. त्याने लॅपटॉप बाजूला ठेवला दाराशी गेला... तो आलाय याची चाहूल लागताच तिने संदीप च गाण लावलं.''इशा तुला... '' एवढंच बोलला तो इतक्यात इशा म्हणाली बाबाचा हात धरुन ती त्याला पावसात घेऊन गेली... दोघेपण मनसोक्त भिजले. भिजून झाल्यावर बाबा पायरीवर येऊन बसला. तेव्हा ती बाबाकडे आली आणि म्हणाली अरे बसतोस काय.. .थंडी वाजतेय एक कटिंग चहा... टपरीवरचा... तिचे ते शब्द ऐकून भरपावसात त्याला रडू कोळसलं.. तिला मिठीत घेत तो इशाला म्हणाला Thank you beta

# पगार

अजून एक सांगू का आइसक्रिम ?''

नको अरे हीच जात नाहीये, कितीची आहे रे ?'' आई खा ना आता किंमत कसली विचारतेस.अरे पण खूप महागाची असेल ना '' हो असुदेत तुला काय करायचं मीदेणार आहे आज पैसे'' असा बोलताना अभिमान त्याच्या चेहऱ्यावर भरुन दिसत होता ''आई पहिल्या पगाराची पार्टीसमज'' असा बोलून त्याने आईकडे पाहिलं. किती गोष्टी लिहिल्या होत्या तिच्या चेहऱ्यावर. अभिमान आनंद समाधान सगळ काही एकदम त्याला लहानपण आठवलं उगीच आई सोबत दुकानात सामान आणायला जायचा.. गोळ्या खायला मिळतील म्हणून. मग तिथं गेलं कि आधी उगची शहाण्यासारखं वागायचं.. मग कळल कि आता काही चॉकलेट मिळणार नाही. कि मग रडायला सुरुवात करायची. नाकातल्या शेम्बुडाच हि त्यावेळी भान राहायचं नाही. एकदा तर आईचे पायच धरुन बसला दुकानासमोर सोडणारच नाही म्हणून चॉकलेट घेतल्या शिवाय. कधी कधी आईसक्रिम नाही दिल म्हणून त्याने रस्त्यातच उड्या मारण्याचा पराक्रम गाजवला होता. कुणाचीही भीती न बाळगता मोठ्याने भोंगा पसरवून द्यायचा कि आपोआप हवं ते मिळत हि पध्दत आपोआप शिकला होता तो. आईची कारण, अरे खूप महाग ओह पैसे नाहीत हि त्याच्यासाठी केवळ ऐकण्यापूर्वी होती. या कारणांमुळे त्याने कधी माघार घेतलेली त्याला स्वतः ला कधी आठवत नव्हतं. शाळेत जाताना पेरुसाठी घेतलेला एक रुपया असो किंवा मग शनिवारचा डब्ब्यात खाऊ नेण्यासाठी केलेला दंगा असो . आज सगळ आठवत होत. नंतर मग जस वय वाढत गेलं परिस्थितीची जाणीव झाली तसा तोही मग शहाण्यासारखा वागू लागलेला. नाही मिळाले पैसे तर बिघडलं कुठे चालत जाऊयात इथपर्यंत त्याने तयारी केलेली स्वतःची मनापासून, कारण आईला एक एक रुपयासाठी करावा लागणारा संघर्ष तो पाहत होता.

म्हणूनच आजचा दिवस खास होता. पहिला पगार, आईला नवीन साडी उगीचच नेसायला लावली होती. मस्त हॉटेल मध्ये जेवण करुन दोघे आईसक्रीम खात बसले होते. आईच्या चेहऱ्यावरचं समाधान पोरगा वाटेला लागल्याच भरभंरुन दिसत होत. तो असाच आपल्या आठवणीत रमला होता. इतक्यात आईनेच आवाज दिला. ''अरे त्यांना म्हण कि जरा 100/200 कमी करा एवढ बील''

आई अग हे फाईव्ह स्टार हॉटेल आहे. '' डोंम्ब्ल्याच फाईव्ह स्टार.. ..... असुदे मला नाही काही फरक पडत एवढं बोले पर्यंत ती मॅनेजरकडे गेली आणि म्हणाली अहो बिल कमी करा कि थोडं एवढं महाग कुठ असत कां. '' त्यावेळी मात्र मॅनेजरचा चेहरा अण्णाच्या हॉटेल मधल्या चहावाल्या सारखा झाला होता

# पैलतीर

विमान सुटायला फक्त अर्धा तास राहिला होता, सगळं चेकिंग वगैरे पूर्ण झालं होतं. तो खुर्चीवर शांत बसला होता. चेहऱ्यावरचे सगळे भाव गोंधळलेले होते. सगळं कसं पहिल्यांदाच घडत होतं विमानाने जायचं ठरलं तेव्हापासून. नव्या स्वप्नांकडे झेप घेताना विमानात बसायला मिळेल अस त्याला कधीच वाटल नव्हतं. इतक्यात विमानाचा आवाज सुरु झाला आणि घो घो करत एका विमानाने आकाशात झेप घेतली. इतक्या जवळून विमान पहिल्यांदाच पाहत होता. तशी विमान पाहण्याची इच्छा फार जुनी होती. एखादं विमान अगदी जवळून पहाव असं खूप वाटायचं त्याला. लहानपणी काय काय केलं होत त्याच्यासाठी. ती चाळ त्या चाळीतलं तिसरं घर. घरावरुन विमान गेलं कि मोठा आवाज यायचा विमानाचा तो आवाज आला कि मग धावत जाऊन खिडकीतून विमान पहायचं तिथून नाही दिसलं कि पळत पळत बाहेर यायचं.. गटारीवरुन उडी मारुन मैदानात यायचं आणि आकाशात विमान शोधायचं.. मग ते सापडलं कि कितीतरी वेळ त्याच्याकडे पाहत बसायचं, कधी विमान दिसलं नाही तरी त्याचा आवाज ऐकून आपण विमान पाहिलं अस मनाला समजावून तो खुश व्हायचा. किती आनंद व्हायचा तेव्हा. कधी कधी तर मग आई मागून यायची आणि एक चापट वाजवायची. चल हो घरात चप्पल नाही आणि चाललाय तसाच उड्या मारत. मग चड्डी वर ओढत नाकाचा शेंबूड पुसत घराकडे पळायचा. कधी कधी सगळे मित्र हाफ चड्डीत वाळूत बसलेले असायचे आणि मग असंच विमान गेलं कि कोण असेल रे विमानात याचा शोध लावायचे. कोण म्हणायचं शाहरुक असेल शुटींगला चालला असेल. कोण म्हणायचं मंत्री असेल, कुणाला सचिन वाटायचा तर कुणाला टाटा. 26 जानेवारीला दूरदर्शनवर विमान उडवताना दाखवायचे. मग ते विमान पाहण्यासाठी सगळी चाळीतली पोरं घरात जमायची. तेव्हा कधी कधी वाटायचं आपण विमान चालवणारं व्हावं. पण तेव्हा मधेच आई म्हणायची आधी बापाची रिक्षा चालवायला शिक मग

विमान उडव. शाळेत कधी कधी कंटाळा आल्यावर कागदाची विमानं बनवून सोडायची मजा तर कशात नाही. एकदा असंच एक विमान बाईंच्या टेबलावर जाऊन पडलं. मग बाईंनी दोन तास कोंबडा बनवून उभं केलेलं. एकदा एन.डी.ए. मध्ये जायची संधी मिळाली तिथं जाऊन पाहिल्यांदाच विमानं पाहिली होती जवळून, मग त्या दिवशी आख्खा चाळीत मी विमानाला पाहिलं. हात लावला अस सांगत सुटलेला तो. आज सगळं आठवत होत कारण स्वप्नवत वाटणारी गोष्ट आज पूर्ण होत होती. इतक्या लवकर विमानात बसायला मिळेल अस वाटलंच नव्हतं.

एकदा तिच्या सोबत असताना तिचा हात हातात घेत उगीच तिला म्हणाला होता, आपण ना विमानांनी जाऊयात फिरायला तेव्हा ती पण म्हणालेली आपली ऐपत आहे का. काही स्वप्नं पाहत नको जाउस. अशा मग जवळच्याच किती तरी लोकांनी मनावर ठाम बिम्बवलं होत कि नाही ते स्वप्नच राहणार. पण आज जेव्हा ते पूर्ण होत होतं तर नको वाटतं होत त्याच लोकांना सोडून जायला. मगाशी जेव्हा सगळे सोडायला आले तेव्हा ती उगीचच हसण्याचा प्रयत्न करत होती, त्यासाठीची धडपड त्याला दिसत होती, जाताना हसत जावं हा तिचा बाणा जपण्यासाठी. कि माझ्यासाठी याच उत्तर मलाही शोधायचं नव्हतं... कारण त्यामागच्या प्रेमाची किंमत कितीतरी होती. आईला मात्र कधीच जमलं नाही डोळयातल्या पाण्यावर राज्य करणं. म्हणूनच त्या दोघींचं एक वेगळ स्वतंत्र स्थान मनात खोल वर रुजलेल होत. लहान असताना जेव्हा आकाशातली विमान पाहायचो तेव्हा आई म्हणायची भडव्या चल शाळेला उशीर होईल आज मात्र विमानतळाच्या गेटवरुन पाय निघत नव्हता तिला सोडून तेव्हा तीच म्हणाली भडव्या जा कि विमानाला उशीर होईल. तेव्हा मग उगीचच तिचा बाणा आपण जपावा वाटलं. आणि डोळ्यातलं पाणी लपवून हसत तो आतमध्ये वळला होता. सगळं आठवताना डोळे भरुन आले होते. त्या पाण्यात समोर येणार विमान धुसर दिसायला लागल होतं.

# पाटी

जांभळाची पाटी भरली आहे हे पाहून तिने झाडावरुन उडी मारली. पाटीतल्या जांभळाकडे एकदा पाहिलं तिच्या चेहऱ्यावर समाधानाचं हसु फुलल... रिमझिम बरसणाऱ्या धारांनी तिला चिंब भिजवून टाकलं होतं.... थोडा कंटाळा आला म्हणून ती तिथेच एका दगडावर बसली. कितीतरी दिवस तेलासाठी तहानलेले केस एकमेकामधे गुंतले होते. डोळ्ंयामध्ये कसलातरी विलक्षण कोरडेपणा आला होता तिच्या समोर गवतावर उड्या मारणाऱ्या फुलपाखराच तिला कौतुक वाटलं.. आपल्याला हि असं उडता आलं असत तर झाडावरची सगळी जांभळ किती पटकन काढली असती आपण.. असं पायाला लागल पण नसत.. पायाला झालेल्या जखमेकडे पाहत ती स्वतःलाच म्हणाली... बसल्या बसल्या पाटीतली जांभळ तिन छान रचून ठेवली. अशी टपोरी जांभळ म्हणल्यावर आज कोणी बी घेईल हे तिला माहित होतं.

तिन पाटी उचलली आणि मोठ्या रस्त्याच्या दिशेन तरातरा निघाली. आज सकाळीच उल्की शाळेला गेली होती. हिला पण जायचं होतं पण आईन सांगितलहोतं तिथ जाऊन कोणाच बी भल होत नाई त्या पाटीपेक्षा हि पाटी उचलली तर निदान दोन पैक तरी मिळतील. मग त्यातला एखादा रुपया आपल्याला मिळणार आणि मग कोपऱ्यावरल्या टपरी वरुन गोळ्या खायला मिळणार या आशेने ती प्रत्येक पाऊल झटपट टाकत होती. घरी पैक घेऊन गेल्यावर ''गुणाची ग माझी पोर'' ऐकून तिला मुठ□भर मास अंगावर चढल्या सारख वाटायचं..

तिच्या विचारात कधी ती मोठ्या रस्त्याला पोहोचली तिलाच कळल नाई. तो पर्यंत पाऊस पण खूप वाढला होता. पण तिकड पाहून तिला चालणार नव्हतं. त्या भर पावसात ती रस्त्यावरुन ताम्हिणीकडे जाणाऱ्या गाडयांना हात दाखवत जांभळ घ्या जांभळ अशी जीवाच्या आकांताने ओरडत होती. पण एवढ्या धो धो कोसाळणाऱ्या पावसात त्या

चिमुरडीकडे कोणाचंच लक्ष जात नव्हतं. रस्त्यावरुन जाणाऱ्या गाड्यांमधली लोक त्यांचे कपडे पाहून आपल्याला पण असे कपडे असावे असं तिला वाटायचं ती आईला म्हणायची तेव्हा आई म्हणायची तिला आपल्याकड जेव्हा पैका येईल न तेव्हा घेऊ आपण. तिच्या अशा बोलण्यामुळ जांभळ विकायला तिला आणखी जोश यायचा.

बराच वेळ झाला पण कोणीच थांबत नव्हतं. जांभळ विकली जात नव्हती.. आपल्याला आज गोळया खायला मिळणार नाई.... आई पण मारलं घरी जाऊन हि भीती क्षण क्षणाला वाढत होती... सकाळ पासून दोन तिन जांभळ खाऊन त्याच्यावरच पुन्हा आपल्या कामाला लागली होती. पायातली जखम वाहणाऱ्या पाण्यात भिजत होती. पण आज एक रुपयाच हि जांभूळ विकल नव्हतं... तिच्या नाकातून शेंबूड आणि डोळ्यात पाणी आलं... ते तसच फोक ला पुसून ती रस्त्याकड डोळे लाऊन उभी राहिली. आजूबाजूचा सारा आसमंत पावसाच्या तालावर लाल धरुन नाचत होता. धो धो कोसळणाऱ्या धबधब्यात लोक बंधुंद नाचत होती. तीच मात्र त्याकडे लक्ष नव्हतं. तिला दिसत होता तो फक्त अस्ताकडे जाणारा सुर्य... हातात लाटन घेतलेली आई.

तिच्या भितीपोटी धो धो कोसळणाऱ्या पावसात भिजत आकांताने एकच गोष्ट ओरडत होती. ‘जांभळ घ्या जांभळ रानातली गोड गोड जांभळ ‘‘

# दूर नभाच्या पल्याड

अचानक पाऊस आल्यावर त्याने गाडी थांबवली आणि धावत जाऊन तो एका झाडाखाली जाऊन थांबला... सकाळ पासून आ□ाळ कोरडच होतं त्यामुळे पाऊस वगैरे येईल अस त्याला अजिबात वाटल नव्हतं. म्हणून त्याने आज रेनकोट सुध्दा सोबत घेतला नव्हता. पाऊस वाढला तशी झाडाखाली पाहून तो स्तब्ध झाला. तिचा तो टॉप आजही तसाच होता. नव्या स्वप्नांची लकाकी डोळ्यात पुन्हा भरुन आली होती. जणू काही नव्या अश्वावर स्वार होऊन आयुष्याचा लगाम तिच्या हातात पुन्हा आला होता.

मन अचानक मागे गेलं चार– वर्षे... नाटकाच्या हॉल मधली ती धावपळ त्याच्या समोर उभी राहिली एक मुलगी असून तिथल्या 40–50 जणांना खूप छान मॅनेज करत होती. जणू काही एखादी वाघीण जंगलावर राज्य करत होती. तिथल्या प्रत्येकाला समजून घेत नव्या उमेदीने नाटक उभ□ करायची तिची जिद्द.सगळ काही अप्रतिम असायचं. तिच्यासमोर जेव्हा प्रथम गेलो तेव्हा ''काय काम आहे इथे '' अस म्हणत अंगावरच आलेली. पुढे मग अनेक नाटक तिच्या सोबत केली होती. काही गाजली काही पडली. पण त्यातुन ती नवीन शिकत जायची पुन्हा उभी राहत होती ती.तो मात्र फक्त काही तरी वेगळा टाईमपास म्हणून तिथे असायचा.. काम मात्र मनापासून असायचं त्याच.. म्हणूनच त्याची आणि तिची खूप मस्त गट्टी जमलेली...

प्रत्येक नात्याच्या तिच्या व्याख्या पण तितक्याच खास असायच्या.. जगण्यावर स्वार व्हायला आवडायचं तिला.. कुणाच्या सोबतीशिवाय एकटीच खिंड लढावी तसं असायचं सगळं तिचं... प्रत्येकाला सोबत घेऊन

निघायची नाटकाच्या वाटेवर स्वार होत. समोर जेव्हा सगळ्या नाटकातली मुल उभी राहिली कि डोळे भरुन यायचे तिचे. ‘‘Its mine " अस अभिमानाने त्याच्या कानात सांगायची. तो पण मग तिच्या कामाला appreciate करायचा, मैत्री जशी जशी वाढत गेली तसा तिच्या बद्दलचा रिस्पेक्ट पण कमी होत गेला. अपेक्षा वाढत गेल्या.नुसता गप्पा मारण आणि केक कापण म्हणजे मैत्री हि जनरल व्याख्या तिला कधीच आवडायची नाही. त्याच्या बेधुंद आयुष्याला लगाम लाऊन त्याला पण एका नवीन दिशेन न्यायचं अस तिन ठरवलं होत. त्याचं बेफिकीर जगण कधीच आवडत नव्हतं तिला. त्याच्याबद्दल लोक बरेच काही बोलायचे पण त्याची तिला फिकर नव्हती कधीच. कारण मैत्री पुढे मग सगळ्याच गोष्टी खुज्या होत्या. कुठलं हि नात अगदी भिल्लासारख खोल रुजवून जगायची ती. पुढे रोजच त्याला सांगू लागली ती हे कर ते कर. त्याला मात्र वाटू लागल हि का restrict करतेय आपल आयुष्य मैत्री आहे ना मैत्री पुरतीच ठेव ना. त्याची तळमळ तिला कधीच कळली नाही तेव्हा.

मग त्यातून तिरस्कार वाढला...भांडण होऊ लागली. प्रेमाच्या वाटेवर निघालेली मैत्री अचानक उध्वस्त होऊ लागली. तिला वाटत होतं नात टिकाव.... एवढं सहज सोप नसत ते मोडण. पण त्याच्यासाठी मात्र नव्हतं तसं काही. ‘स्व’ च्या पुढे कधीच चालायचं नाही त्याच... एन्जोय कराव आणि आपल्या वाट्यान निघाव एवढीच मैत्री असते असं वाटायचं त्याला.जीवापाड जाऊन सगळ सोडून मैत्री टिकवण्याचा तिचा प्रयत्न त्याला कधीच कळला नाही... आणि निघून गेला तो आयुष्यातून तिच्या एक दिवस...

आणि रानाची वाघीण मोडून पडली अक्षरशः.राग तो जाण्याचा नव्हता...राग होता तो एवढं सगळ करुन देखील मैत्रीत उपेक्षित राहिल्याचा...तिला वाटायला लागलं अरे सगळे आपले आहेत पण एन्जोय करे पर्यंत.. पण एका सीमेपलीकडे आपला आयुष्य आपल्यालाच जगावं लागत एकट्याने.तिच्या रक्ताळलेल्या मनाला सावरणार कुणीच आल नाई तेव्हा.तिला अपेक्षा पण नव्हती.आंधळेपणाने छातीठोकपणे ‘‘हि माझी लोक’’ असे लोकांना सांगणारी ती बदलूनच गेली एकदम.. वषभर टिकवलेलं मनापासून जोपासलेल नात इतक्या सहज संपून जाईल अस

वाटलंच नव्हत तिला.. किती वर्ष वाट पाहिली तिने कि येईल तो परत माझ्यासाठी नाही मैत्री खातर तरी... पण तिची मैत्री त्याला कळलीच नव

हती कधी.त्यामुळे वाटत हि नव्हत कदाचित त्याला काहीच त्याबददल तेव्हा.

एक काळ लोटून गेला... तसं त्याला पटू लागल ती नव्हती चुकीची.. आपल्याला ओळखताच येत नाही आपलं कोण दुसरं कोण.. कदाचित ऐकायला हव होत तेव्हा तिचं तिच्या त्या प्रामाणिक प्रयत्नांना restriction समजून खूप चूक केली आपण.. कपडे बदलावीत तशी माणसं बदलली त्यामुळे नात्याचं झाड फुललच नाही कधी.. तेवढ्या पुरत समाधान फक्त.. आज इतकी लोक सोबत असून एकटे आहोत आपण याची जाणीव पदोपदी तिची आठवण करुन दयायची. वाटायचं जाव परत आणि सांगाव तिला चुकलो मी हातत छडी घे आणि नीट कर मला.. पण परत वाटायचं त्याला तिनच याव आपल्या जवळ आणि आपल्याला सॉरी म्हणाव आधी. ॲटीट्यूट कधीच बदलत नव्हता त्याचा. याचमुळे गेल्या काही वर्षात नको इतकी लांब गेली होती ती. आज त्याला खूप इच्छा झाली जाव तिच्या समोर आणि चुकलो म्हणाव तिला. सगळ सोडून त्या पावसात तो तिच्या समोर गेला. तिची नजर एकदम गेली त्याच्याकडे. त्याला वाटल होत आजही तितक्याच आशेने ती वाट पाहत असेल आपली. त्याला पाहताच तिने हाय केल फक्त त्याला आज इकडे कुठे एवढं विचारलं. इतक्यात कुणाचा तरी फोन आला. “ Yes I am reaching in 10 mnts" अस म्हणत त्याची दखल न घेता ती तिथून निघाली. त्याला कळाल सॉरी म्हणायला खूपच उशीर झालाय. तिच्या मनातली आपली जागा आता आपल्या हक्काची नाही राहिली..... त्याच्या डोळ्यात पाणी आलं.ती होती.त्यांची मैत्री मात्र ते गाव सोडून कधीची निघून गेली होती. कदाचित थोडा आधी आलो असतो तर...एवढं म्हणत भर पावसात तो तसाच आपल्या गाडीकडे निघाला..

# वेर्लेरेन

"बाई आहेत का ? " त्याने घरचं दार वाजवत विचारलं. तेव्हा एक व्यक्ती बाहेर आली. केस पूर्णपणे पांढरे झाले होते. हातात थोडा काप्रा भरला होता. डोळे पण अगदी आत गेले होते. बाईंची ती अस्वस्था पाहून त्याला मनात थोड धस्स झालं. किती म्हाताऱ्या झाल्यात न बाई.... 12–15 वर्षात एवढ्या बदलून गेल्यात. 'बाई ओळखत का ?" त्याने पुढे होऊन नमस्कार केला त्यांना. "हो मग तुला ओळखणार नाही का रे कार्ट्या " त्यांच्या आवाजातली ती धार आज हि कायम होती. आज कसा काय आलास एवढ्या दिवसानंतर. "आठवण आली बाई तुमची म्हणून आलो शाळेतल्या बाई म्हणजे आईच ना तुम्हाला कसं विसरु " त्याचं हे बोलणं ऐकून त्यांच्या चेहऱ्यावरचं हसु फुललं. मग काय करतोस आता ? बाई तहसीलदार झालोय. मागच्या वर्षी परीक्षा पास झालोय. "अरे वा" आपल्या मुलाला एखाद मोठं पद मिळावं असा आनंद झाला त्यांना. 'आई बापाचं नाव काढलंस रे पोरा किती कष्ट केले त्यांनी तुझ्यासाठी आज खुश झाले असतील ना. " त्यांचं हे बोलणं ऐकून अरे बाईंना सगळं लक्षात आहे आपल्याबद्दल याचा आनंद झाला त्याला.

बाई आज तुमच्याशी बोलायचं खूप खूप... जीव अगदी तळमळत होता त्यासाठी म्हणलं आज जाऊच त्याशिवाय समाधान होणार नाही मनाचं. म्हणून आलो, "बोल कि मग बाई लहान असताना तुम्ही शिकवलेलं सगळ्यांशी खरं बोलायचं..भारतातले सारे भारतीय माझे बांधव आहेत तेव्हा प्रत्येकाचा विचार करायचा जगताना. किती छान शिकवायच्या तुम्ही तेव्हा, शाळेत एकदा भाषणाची स्पर्धा होती तेव्हा देशावरचं माझं भाषण ऐकूण तुम्ही माझी पाठ थोपटली होती. " एका हातात पिस्तुलाची जळती आग दुसऱ्या हातात बॅाम्बचा स्फोटक निखारा अशा हातांनी त्याने इंग्रज सैन्याला तोंड दिलं... अझादांवरचं ते भाषण ऐकल्यावर तुम्हीच म्हणाला होता अंगावर काटा आणलास पोरा बाई आठवतंय तुम्ही कार्यानुभवचा तास घ्यायचा तेव्हा खूप काही सांगायचा देशभक्तीबद्दल तेव्हाच ठरवलेलं बाई कि देशासाठी जगायचं आणि देशासाठीच मरायचं.. सत्तेत जायचं आणि बदलायचं सगळं. म्हणून इतका अभ्यास केला

अगदी दिवस रात्र राबलो त्यासाठी... पण जे करायचं होत ते जमलंच नाही बाई... ज्या सिस्टिमला बदलायला निघालेलो तिचा मीच कधी भाग होऊन गेलो कळालं पण नाही. इच्छा नव्हती बाई... पण वरच्यांची पोटं भरण्यासाठी टेबलखालचे पैसे घ्यायला पर्याय नव्हताच काही माझ्याकडे. पैसे खावे लागतात बाई.. ते केलं नाहीतर बदलीच्या धमक्या.. त्यांना घाबरलो मी कायरासारखा.. बाई खरंच जेव्हा जेव्हा पैसा यायचा ना हातात तेव्हा तुम्ही आठवायच्या वाटायचं बाईंना काय वाटेल कळालं तर. पण पर्यायच नव्हता बाई. प्रत्येकाचा विचार करता करता सिस्टीम चा भाग व्हावच लागलं बाई " तो दोन मिनिट थांबला म्हणाला "बाई मी आज ठरवलंय कि मेलो तरी बेहत्तर एक वर्ष जे झालं ते झालं पण तुमचा आर्शिवाद असेल ना तर होईल सगळ नीट " बाई ती कविता आठवतेय कुसुमाग्रजांची "कणा".. अगदी तसच बाई पाठीवर हात ठेऊन नुसता लढ म्हणा बाई"..

तो बाईंच्या चरणाशी बसला... बाईंचे डोळे पाणावले होते...त्याचे हि. .. कोणत्या तोंडाने आशीर्वाद देऊ पोरा,.......त्यांचे हे शब्द ऐकून तो गडबडला... "बाई." अरे ज्या बाईन तुला हे शिकवलं ना त्या बाईन्निच 5000 दिले टेबल खालून पेन्शन सुरु करण्यासाठी. मुलाच्या नोकरी साठी पाच लाख ज्या हातांनी काढून दिले ते हात कोणत्या तोंडाने आशीर्वाद देणार तुला लढण्यासाठी. हाती तलवार घेऊन लढणं शक्य नाही रे आता. .. स्वतःसाठीच स्वतःला बदलून स्वतःचं जगणं सुकर करावं लागतंय नाहीतर देशभक्तांना फक्त पुतळ्यांची जागा मिळते रे. तू नक्की प्रयत्न कर त्यासाठी पण त्यासाठी आर्शीवाद देण्याचा हक्क मी कधीच गमावलाय मुला" त्यांचे ते शब्द ऐकले.. या विषारी सपानं कुठपर्यंत मजल मारली आहे याचा त्याला अंदाज आला. या सापाशी मैत्री केली नाहीतर हा साप आपल्यालाही चावेल एक दिवस... संपू आपण पण याची भीती पुन्हा भरली मनात... आणि मग आपल्यानंतर आपल्या कुटुंबाचं काय होणार या विचाराने शेवटी त्याने त्या सापापुढे मैत्रीचा हात पसरवण्याचा निर्णय घेतला.

# शून्य

परत फोन वाजला. त्याने बघितलं तिचाच फोन होता तो. सकाळ पासून जवळ जवळ 25 वा फोन होता तो. सकाळ पासून तिचा एकही फोन उचलला नव्हता त्याने. अणि कट हि केला नव्हता. फोन आल्यानंतर कित्येकदा त्याचा हात फोन कट करायला पुढे गेला पण तो फोन नव्हता कट करु शकत नव्हता का? या प्रश्नाच उत्तर त्यालाही मिळत नव्हतं.

कदाचित, वर्ष भरानंतर हि हा हात अजून तिचाच गुलाम का आहे याचा त्याला राग आला. आज एवढे फोन येत आहेत काही झाल तर नसेल ना त्याला भीती वाटत होती. पण लगेचच, का वाटावी भीती तिची, तिच्या आयुष्याची असा विचारही येत हात त्याच्या डोक्यात ,सकाळ पासून एवढे फोन काहीच कळत नव्हत. बोलणार तरी कुणाशी विचारणार तरी कुणाला काय झालय म्हणून. किती दूर पोहोचली होती ती. पैसा प्रसिध्दी सगळ काही मिळवल होतं तिन. होतीच ती अशी स्वप्नांच्या अफाट जाळ्यात स्वतःला झोकून देणारी. स्वतःच स्वप्नांच जाळ एवढं दाट होत कि कुणाची कधीच गरज वाटायची नाही तिल. I am so strong अस म्हणत किती वेगाने धावायची ती बेभान होऊन सुटायची स्वप्नांमागे, मग कुणाचाही विचार नसायचा तिच्या डोकयामध्ये मित्र नाती सगळं मग शून्य होऊन जायचं. किती छान मैत्री होती तिच्या सोबतची त्याच्या डोळ्यात उगीच पाणी आलं. जेव्हा स्वप्नांची होळी पेटलेली नसायची ना डोक्यात आई सारखी काळजी घ्यायची. डोक्यातून हात फिरवायची आजारी असल्यावर. डोक चेपून देऊ का विचारायची मग किती छान वाटायची ती. तिचा एक हात हातात घेऊन किती तरी वेळ तिच्या मांडीवर शांत निजायचा तो.ती पण मग काही तरी उगीच सांगत बसायची त्याला. नको तेवढ लेक्चर झोडायची त्याला. हे कर ते कर... पण त्याला कधीच आवडायचं नाही ते , तिला मात्र सोडण शकयच नव्हत. त्याच्यासाठी, शेवटी नाहीच जमल त्याला तिच्या वेगाने धावायला, खूप दूर निघून गेली ती. नजरेस पडणार हि नाही इतकी दूर. किती जोराने ओरडला होतं तो थांब थांब पण स्वप्नांच्या कल्लोळात तिला

नाहीच ऐकू आली त्याची हाक, डोळ्यातला पाऊस दिसण तर शक्यच नव्हतं कधी. गेली ती कायमचीच नंतर  फक्त कधीतरी फोन यायचा आज हा पुरस्कार मिळाला आज हे मिळालं. नंतर नंतर ते पण लोकांकडून कळायला लागलं त्याला. कसा आहेस ? एकदा तरी विचारेल ती या आशेने तो फान उचलायचा पण तिन नाही विचारल कधी नंतर मग हळू हळू फोन येन पण बंद झालं. त्याने सावरलं स्वतःला स्वतःची वाट शोधत अडखळत निघाला तो जीवनाच्या वाटेवर .थोडाफार कदाचित विसरला हि होता तिला,  नवीन हास्य चेहऱ्यावर फुलवुन नेहमीच्या पध्दतीने जगण चालू होत त्याच. मधे बऱ्याच बातम्या कळल्या होत्या त्याला तिच्याबद्दल. आयुष्य खुप जास्त बेभान झाल होत तिच.  दारुच्या नशेत सापडली होती म्हणे एक दोनदा कुठेतरी. पण जगात अशा अनेक गप्पा रंगतात त्यावर त्याचा विश्वास नव्हता.खूप दूरवर पोहोचली असेल वाटलेलं त्याल.

आज का फोन येतोय कळात नव्हतं त्याला.  परत फोन आला शेवटी न राहून त्याने उचलला फोन कानाला लावला. काहीच बोलला नाही. पलीकडून आवाज येत होता हॅलो हॅलो पण याच्या तोंडातून शब्द फुटत नव्हता.  डोळेही त्याचे गुलाम झाले होते भरुन आले होते. '' हा बोल '' एवढाच बोलला तो.. आणि समोरुन एकदम रडण्याचा आवाज आला. ''भेटना मला प्लीज लगेच तुझी वाट पाहतेय आईक्ना मला ना उभपण नाही राहता येत हा आणि तुला माहिती आहे का मी अशी पडलीये कुठेतरी. कुठेय मी मला माहिती आहे का नाही '' असबंध काहीतरी बडबड करत होती. त्याला काळजी वाटायला लागली होती कुठेस त्याने विचारल तिला काहीच सांगता येत नव्हत गाड्यांचा आवाज येत होता.  कुणाला तरी फोन दे त्याने चार पाच वेळा ओरडल्यावर तिने रस्त्यावरच्या कुणाला तरी फोन दिला.. तेव्हा रस्त्यावर गाडी उभी करुन ती गाडीत बसल्याच कळत त्याला. खूप जास्त घेतलेली होती तिने तेव्हा.

तो तिला घरी घेऊन आला काहीतरी बडबड चालूच होती कुणीतरी फसवलय, खूप लॉस झालाय.  बरच काही बोलत होती ती. जिला बघून एकटी सार जग जिंकल हि असा वाटायचं तिला नीट उभहि राहता येत नव्हतं. तो तिच्या शेजारी बसला पाणी दिल तिला प्यायला.  का का धावलीस एवढ थांबयचस ना थोडसं. एवढी धावलीस कि स्वतःला हि माग टाकलस येडू तू. तो येडू म्हणल्यावर ती हसली म्हणाली ''येडू'' परत

बोल ना 'येडू' का तेव्हा तर राग यायचा ना तुला येडू म्हणल्यावर मग आता ? नाही रे मी येडूच होते म्हणून तर अशी झालेना. सगळ गेल रे.. मला ना स्वतला भेटायचय ती म्हणाली.

कशी भेट घालून देऊ तुला तिच्याशी ती तर वर्षापूर्वीच गेली दूर मी पण शोधतोय तिला. कुठे टाकून आलीस तू तिला सांग ना. ती नुसती हसली वेड्यासारखी. नाही माहित . ये तू कुठे होतास सांग ना.. मला का नाही आला भेटायला. मी खूप खूप थकलेले वाटलेलं तू येशील पण नाही आला. तिच्या डोळ्यात पाणी आल कस येणार सांग ना, किती दूर गेली होतीस तू, किती " होना सगळ सोडलं मी स्वतःसाठी स्वतःला पण, एवढं बोलली आणि मग त्याला म्हणाली इथ बस ना माझ्या शेजारी.. . बसना. तो बसला. तिन डोक त्याच्या मांडीवर टेकवल. तो शांत होता. अरे हात फिरवना डोक्यावरुन. तिचे ते शब्द ऐकले आणि त्याच्या डोळयात पाणी आल. कधी पासून वाट पाहत होता ती यावी तिच्या मांडीवर शांत डोक टेकवाव. आणि तिला म्हणाव डोक्यातून हात फिरव ना ग... पण आज वेळ येईल वाटल हि नव्हत. त्याने तिच्या डोक्यावरुन हात फिरवला. त्याचा एक हात हातात घेतला तेव्हा एक समाधानच हास्य फुलल तिच्या चेहऱ्यावर. कदाचित हेच हवं होत तिला डोक्यातुन फिरणारा हात मात्र थांबला नव्हता. थोड्यावेळाने झोपेत असणाऱ्या तिचा हात स्वतःच हातात घेऊन स्वतच्या डोक्यावर ठेऊन किती तरी वेळ फिरवत बसला तो......डोळ्यातल पाणी संपेपर्यंत.

# तुझ्याविना

जिंदगी को मांगा जब जब हमने दोस्ती का हात
जिंदगी शराब पिलाती चली गयी
मांगी हमने जब जब दुवा कुदरत से
वो भी हात मे पिस्तुल ठुमाती चली गयी

त्याने शायरीच शेवटच वाक्य वाचलं आणि टाळ्यांचा कडकडाट झाला. स्टेज वरुन तो निघाला आणि गाडीत बसला. ‘‘चल‘‘ अस म्हणत त्याने इशारा दिला आणि गाडी सुसाट वेगाने निघाली. धरणाकडे घे गाडी एवढं म्हणून तो रस्त्यावरुन जाणार्या गाड्यांमध्ये उगीच मन रमवत बसला. पण आठवणींच उठलेला मोहोळ थंड होत नव्हत अजिबात. शेवटी डोळे मिटून घेतले आणि अनेक वर्ष कोंडून ठेवलेल्या आठवणी आभाळ कोसळाव तश्या कोसळू लागल्या.

सिंहगडाच्या मागच्या कल्याण दरवाजाजवळ बसायची ती जागा. पावसात छानसा झरा वाहत असायचा..मग तिथल्याच एखाद्या कागदाची छानसी होडी करुन त्यावर ‘‘he is only mine‘‘ लिहून सोडाची त्यात. तो म्हणायचा काय हा बालीशपणा.. ? तेव्हा ती म्हणायची स्वततल लहान मुल नसतं मरुन द्यायचं कधीच.. आणि हे झरे आपला संदेश त्या विधात्या पर्यंत पोहोचवतात. म्हणून लिहिले कळल. तिच्या अस वागण्याच हसू

यायचं. पण अशा छोट्या गोष्टीमधून तीन तिच जगण केवढ सोप करुन घेतलं होत. सृष्टीतल्या प्रत्येक गोष्टीला नवीन अर्थ द्यायची ती... फुलवायची जगण कुठेही... कसही... एकदा तर हॉटेलमध्ये तिथल्या वेटर ला घेऊन मुद्दामच फजिती केली होती... कोणाशीही अगदी सहज नात जोडून आनंदाचे नवीन झरे फुलवत राहायची.. मजा वाटायची तिच्या सोबतीची... आपल्याला हव असलेल सगळ काही मिळालंय अस वाटायचं त्याला... एका वाढदिवसाला तर एक मस्त रोपट विकत घेतलं आणि नेहमीच्या भेटण्याच्या जागी लावल... तुझ्या माझ्या जगण्याचं प्रतिक असेल हे झाड... हे झाड जेव्हा मोठ होईल ना तेव्हा त्याच्या सावलीत बसायचय मला तुझ्या सोबत... लोकांना दाखवायचं हे बघा अस फुलवायचं असते प्रेम... तो असाच कविता करायचा कधी तरी... तिला म्हणून दाखवायचा... पण लिहून मात्र कधी ठेवल्याच नव्हत्या... जेव्हा तिला कळल तेव्हा ती स्वत लिहून ठेवायची सगळ्या कविता त्याच्या "कसला कंटाळा रे तुला एवढा लिहायचा मी लिहून ठेवते कविता आणि माझ्या नावाने काढते पुस्तक एखाद तू रहा मग बघत मला पुरस्कार घेताना, 'अस म्हणत कितीतरी कविता तीन लिहून पाठवायची मेसेज करुन आणि विचारायची कशी झालीये सांग ना... तेव्हा काय काय म्हणाव हिला अस होऊन जायचं त्याला... कविता पण तो फक्त तिच्यासाठी करायचा... मोठा कवी होण्याच स्वप्न त्याने कधी पाहिलं हि नव्हत... ती सोडून स्वप्न पडली आहेत अस आठवत हि नव्हतं.. एक दिवस मात्र गेली ती खूप दूर.. .. कारण काही असो पण तिला जाव लागल... ती गेली तेव्हा तिच्या डोळ्यात पाणी नव्हतच अजिबात कदाचित त्यानंतर माझ्या पापण्या ओलावल्या असत्या तर बघवलं नसतं तिला म्हणून असावं ते... जाताना मात्र कवितेच्या वह्या देऊन गेली हातात.. माझ्या शब्दांना कोणत्या हाताने रेखाटल होत देव जाणे.. त्यानंतर खूप कविता केलया.. पण तसा रस मात्र नाहीच भरला गेला त्यात नंतर. अश्रुंचे झरे वाहन्यांआधीच ती जिथे जिथे उरली असेल तिथून गोळा करत गेला तो.. त्या कविता.. ते झाड .. काय काय जपून ठेवल.. त्या दिवशी पासून झोप पण नीट लागली नाही आजवर कारण स्वप्नात उरलेली ती गेली निघून तर...

गाडी धरणाजवळ आली चालत तो जरा वरच्या बाजूला गेला... पाहतो तर काय एक झरा त्या झाडाजवळून वाहू लागलेला.. झाड छान

पैकी फुललं होत. आभाळाला टेकल होत. तो शांत बसला त्या झाडाखाली.त्या प्रसिध्दीचा कंटाळा आलेला त्याला. एकटेपणाशी दोस्ती झाली होती. तिथल्याच एका कागदाची होडी केली त्याने आणि त्या पाण्यात सोडली त्यावर लिहील होत I MISS HER "

# बदल

पप्पा फोन देना " आदित्य कधीचा मागे लागलेला त्याच्या... आधी नाही नाही म्हणणाऱ्या त्याने शेवटी फोन दिला त्याच्या हातामध्ये... तयाला अजिबात इच्छा नव्हती फोन द्यायची पण दुसरा पर्याय तरी कुठे होता. त्याच्याकडे .. त्याला वाटायचं आपण जस लहानपणी मस्त मैदानात जाऊन खेळायचो... नदीत जाऊन डुंबायचो तस त्यानेही एन्जोय कराव बालपण... टायर घेऊन रस्त्याने धावत सुटाव मस्त पैकी..

मैदानावरची ती मस्ती.. तो गोंधळ अनु□वायला हवा त्याने... रस्त्यावर मांडलेली लागोरची उडवून मस्त धावायला हव मैदानात... सायकल घेऊन दूरवर □टकायला हव.. हेच तर खर बालपण असत....हेच असत बेधुंद जगणं... पावसात जाऊन चिखलात लोळण्याची मजा वॉटरपार्क मध्ये नाही मिळणार त्याला...

त्याला सांगायचं होत कि"आदित्य go enjoy this childhood" पण नव्हता सांगू शकत तो..कारण लगोरची मांडण्यासाठीच मैदान कधीच गायब झाली होती..कुणाच्या तरी राहण्यासाठी आमची घाण नदीत टाकून त्या पाण्याला स्पर्श हि करु शकत नाही एवढी घाण करुन ठेवली होती ती.तिथं जाऊन पोहण अजिबातच शक्य नव्हत. घरात आल्यावर दार बंद करुन घेण्याची सवय त्यानेच लावली होती... कशी कळणार ती मैदानावरची मैत्री... भांडणं.... तो एकदा घेऊन हि गेला होता त्याला मैदानात पण कोणीच नव्हतं तेथे खेळायला.. घरातले कॉम्प्युटर मात्र दिवस रात्र गेम च्या आवाजाने दणाणत होते. आपला मुलगा खूप शहाणा आहे. अजिबात घराच्या बाहेर पडत नाही अस जेव्हा अभिमानाने लोक सांगायचे तेव्हा कोमेजून जाणाऱ्या बालपणाची कीव यायची त्याला... त्याला वाटायचं कि आजीची एखादी गोष्ट त्यालाही ऐकायला मिळावी पण आजीकडे वृध्दाश्रमात कोण घेऊन जाणार त्याला.....आईला हि मालिकांमधून बाहेर पडण अशक्य होत, स्वत: करावं काहीतरी खेळावं त्याच्यासाठी तर वेळ आणणार कुठून...रोजच्या धावण्याच्या स्पर्धेतून बाहेर

पडायचं म्हटलं. तर हरण्याची भीती मानगुटी वर बसायची... सगळ कळत होत..पूर्वीच ते बालपण आता शिबिरांमधून सर्रास विकत घ्यावं लागत.. आपणच जगण्याचे नियम बदलून बालपण महाग करुन ठेवलंय अस त्याला उगीच वाटायचं.. राग यायचा त्याला स्वतःच्या स्वार्थासाठी आपणच हिरावलयं मुलांच बालपण या गोष्टीचा.. बालपण कसं अगदी विस्तीर्ण असायला हवं आकाशासारख...पण कॉम्प्युटर समोरच्या खुर्ची इतकं लहान झालंय ते.. तिथ हि VIRTUAL जगण्याचा फास त्यांना कधी गिळंकृत करुन घेतो कुणाला कळतही नाही. घरात एकटे राहून कुटुंब नावाचा स्वर्ग काय असतो हे कळणार तरी कस त्यांना... एकमेकांसाठी जगण्याची ती ओढ कॉम्प्युटर समोर बसुन नाही कळत.त्यासाठी मैत्री फुलवायला लागते.. नवीन लोकांशी जोडायला लागतं... तो मायेचा स्पर्श.. आजीची प्रेमाची थाप फेसबुक वरुन मिळत असेल हि पण हृदयापर्यंत पोचत नाहीच ना.. कुणासाठी डोळ्यात पाणी येणं हे SMILEY INSERT करण्याइतक सोप्प नसतं.. हे कळणार कस त्यांना अशा गोष्टी शिकवता येत नाही. त्या अनुभवायलाच लागतात. त्यासाठी घर घर असायला लागतं.नुसत्या भिंती उभ्या करुन त्यावर करोडोंच फर्निचर चिटकवून काही होत नाही..पण ही गोष्ट नुसती आदित्य ला सांगून उपयोग काय त्याचा? त्याने एकदा आदित्य ला लहानपणीच्या त्याच्या मैत्री बद्दल सांगितल होत. . तेव्हा काय बाबा तुला दोनच मित्र होते. हे बघ मला 500 मित्र ॲड आहेत. त्यावेळी नात जोडणं हे ॲड फ्रेंड वर क्लीक करण्या इतकं सोप्प नसत अस सांगायचं होत त्याला पण नाही सांगू शकला तो कारण त्याला ते पटल हि नसत.. पोट भरण्यासाठी काम करणाऱ्या त्याच्यासारख्या एका बापानेच बनवल होत ते. दोष आदित्य ला देण्यात अर्थच नव्हता. आजही त्याला वाटत होत हे सगळ बोलाव म्हणून. पण आता त्याला हि सवय झाली होती तो समोर येताच मोबाईल त्याच्या हातात देण्याची. त्याचं भविष्य अंधारात दिसत असतानाही... कारण त्यानेच बंद करुन टाकल्या होत्या बाकीच्या सर्व वाटा...

# दुनियादारी

खूप दिवसांनी मेसेज आला त्याला चल न जाऊयात मुव्हीला...खूप दिवसानंतर तिचा आलेला मेसेज पाहून तोही खुश झाला.. कामाच्या गराड्यात तोही खुप जास्त कंटाळून गेला होता. त्यात तिचा मेसेज म्हणल्यावर तो  थोडा भलताच खुष झाला. बऱ्यांच दिवसांनी म्हणजे जवळ जवळ वर्ष भरानंतर आलेला मेसेज होता तो.  कामाच्या गराड्यात वर्षभरात कुणाला भेटताच आलं नव्हतं.  मग काय मारली किक गाडीला आणि निघाला तो वेगाने... आभाळ भरुन आलेलंच होत कधीच.. त्याल फक्त थोडावेळ थांब म्हणायचं होत कारण अजून मागची सीट रिकामीच होती. कदाचित ते पाहूनच तो दिवसभर थांबला होता... उरक रे पटकन म्हणत होता... 6 चा शो त्यात  दुनियादारी..निघता निघता 5 वाजलेले. तिचा मात्र नेहमीचाच उशीर... वर्षभरानंतर ती गोष्ट मात्र तिन कसोशीन पाळलेली होती.. ती आली मागे बसली आणि जणू काही सिग्नल मिळावा असा पाऊस सुरु झाला.. किती तरी दिवसांनी मनसोक्त भिजत होतो. पाऊस ही म्हणत होता देख तेरे लिये बरस रहा हु... तिला कळणार नाही अशा यातच त्याने पावसाला थँक यू म्हणल. आणि मग काय .. मग काहीच नाही रस्त्यावरचे अडथळे  नेहमीचे यायला लागले मध्ये मध्ये... रोजच सिग्नलला  थांबणारा तो आज मात्र सिग्नल लागला हि शिव्या हासडू लागला. काय हे.. मी आल्यावरच का ??  चार पाच सिग्नल चक्क मोडले  50 कट मारले असतील पण तरीही प्रभातला काही पोचेना.. त्यात किती लोकांनी गाड्या आडव्या घातल्या देव जाणे.. शेवटी सव्वासहा ला कसेबसे पोहोचले ते... आणि पाहिला तो फक्त हाऊसफुल्ल चा बोर्ड... बऱ्याच दिवसांनी तिला दोष देण्याची संधी तो सोडणार थोडीच होता.. मग बस आवरत अजून... गेला ना शो... उगीच मी फक्त मुवी साठी आलो होतो अस दाखवण्याचा त्याचा खोटा प्रयत्न तिला कळाल नाही अस

नाही... पण आजही तिला उगीच सॉरी म्हणण्याचा मुड होता... सगळी काही चालली होती ती फक्त दुनियादारीच... मग काय पावसाला म्हणाला तो आता मुव्ही नाही... होऊन जाऊ दे .... आणि झाला कि सुरु... तिला उगीच म्हणल अग काहीतरी घाल किती दिवसांनी भिजते आज... भिजुदेत ना... शेवटच बहुतेक सोबतच भिजलो होतो.. आठवतंय का तरी तुला... या प्रश्नाला मात्र सहज बगल दिली म्हणाला चल ना चहा पिऊयात मस्त... अमृततुल्य चा.. पण त्यात पाणी पडेल ना.. पडूदेत ना मग... अजून छान लागेल.. चल.तिच्या नाटक्या वागण्याची त्याला मजा आली.. किती दिवसांनी निघाली होती ट्रिप.. कालेजात असताना ढग भरुन आले कि गाडी वेगात सुटायची खिशात काही नसल तरी चहाची सोय होत असे आरामात. आता मात्र पाकीट फुल असून हि नव्हतं शक्य जाण... आज किती दिवासंनी तो मौका मिळालेला त्याला... अमृततुल्य चा चहा आणला नेहमीसारखा एक ग्लास एक्स्ट्रा तिच्यासाठी भाजेल म्हणून... तिच्या ग्लास वर उगीच पकडलेला हात.. पाणी पडू नये म्हणून... किती गरम आहे... माझा ग्लास रिकामा होईपर्यंत परत परत एकच डायलॉग... वाटल होत थोडी तरी बदलली असेल पण तशीच अगदी.... आणि तीच ते नेहमीच ती बघ कसली भारी... आधी दोघ मिळून मुली पाहायचो... कसली मजा यायची त्याला... आता मात्र सगळच संपल होत... अमृततुल्य चे दोन चहा संपले आणि मग रस्ता शोधत.. गाडी निघाली खाण्याच्या गाड्यांकडे... पाणीपुरी... वडापाव काय काय भरत होते पोटात जणू... त्या ट्रीपला उगीचच सतराशे साठ विघ्न लागले होते. कुठे वडापाव वाल्याचा पावच संपलेला कुठे रस्त्यात मोठा खड्डाच लागलेला. असे खात होते तसं काही सहा महिने रिकामंच असावं पोट... आणि मन हि... आज मात्र ओलचिंब झालेलं मन सगळ किती छान वाटत होत उगीचच गाडी घराजवळ आली तशी हळूहळू जाऊ लागली.. संपूच नये प्रवास अस वाटत होत त्याला... पण उद्याच ऑफीस... जावच लागणार होत... शेवटी घर आलं तीच... उगीचच चेहरा पडला त्याचा.. निघतो म्हणाला, निघतो नाही येतो म्हणावं तेव्हा मात्र त्याचे डोळे भरुन आले... ती येईल पुन्हा असं म्हणत थांबला होता तो वर्ष भर... शेवटी त्याला निघावच लागलेलं... आज तिच्या तोंडून हे ऐकल काहीच बोलला नाही. चल बाय एवढाच बोलला तो.. थोडा पुढे गेला इतक्यात आवाज दिला तिने मागून ऐक उद्याचे तिकीट काढून ठेवतेय मी... संध्याकाळी सहा.. सुट्टी घेतली

आहे उद्या मी... तो मनात हसला... पावसा उदया परत सहा... त्याने लगेचच निरोप पाठवला... आणि तिला जातो म्हणाला त्याची गाडी सुसाट वेगाने घराकडे निघाली.तिचा चेहरा पण आज बऱ्याच दिवसांनी फुलला होता.

# मैत्र जीवांचे

HAPPY FRIENDSHIP DAY सकाळ पासून किती मेसेज आले होते सर्वांचे, खरतर मैत्रदिन होता उद्या. पण त्याचदिवशी फ्री असणारे मेसेज एकदम सुट्टीवर जात असल्याने सगळयांनी एक दिवस आधीच साजरा करण्याची नवी पध्दत आता सुरु झाली आहे. शुभेच्छा देताना त्याला असणारा Practicle Touch पाहून सगळ्याच गोष्टी किती Artificial झाल्यात ना. ज्यांची कधी आपुलकीने चौकशी पण केली नाही अशा कितीतरी लोकांचे मेसेज आले होते. ते मेसेज वाचून मनात कुठेच काही वाटत नव्हतं. नुसती ओळख असण म्हणजे मैत्री का ? तिला उगीच कृष्ण सुदाम्याची गोष्ट पण आठवली. अशी मैत्रीची नाती टिकवण खरचं किती अवघड असत हे गेल्या काही दिवसात कळलं होत तिला. अशी Artificial मैत्री मेसेज सारखीच फक्त डिलीट बटन दाबण्याचा अवकाश कि क्षणात विसर्जित होते. गळ्यात गळ्यात गळा घालून रडत तू जाऊ नकोस ना अस म्हणणार तिला अजूनही नव्हत कुणी भेटल.जेव्हा अस कोणी भेटतं तेव्हा हातात बांधण्याच्या धाग्यांची गरज कधीच उरत नसते. हे तिला खूप छान माहित होत. अशा मैत्रीत मग अगदी मनातल्या गोष्टी बोलायच्या नसतात. आपली दुःख वाटायची नसतात. ह्या नवीन व्याख्या तिने काही दिवसात शिकून हि घेतल्या होत्या. हि मैत्री तशी पचनारी नव्हतीच पण समाजात राहायचं म्हणजे त्याच्या सोबत बदलणं तितकच गरजेच होतं.

म्हणूनच आज तिने एका खास व्यक्तिशी मैत्री करायचं ठरवल होत. मैत्री म्हणजे काय कि जिथ मनातली प्रत्येक गोष्ट बोलता येईल. जिथे मनाचं प्रत्येक पान अगदी विश्वासाने उलगडून दाखवता येईल. आयुष्यातली काही फाटकी पान सांभाळून काळजीने दाखवता येतीलं अस हक्काच ठिकाण.जिथ आपल्या चुकांना नक्कीच माफी नसेल. पण त्या चुका जाणून घेणार कोणीतरी असेल अस ठिकाण. मैत्री टिकवण ते

फुलवण कुण्या येड्याच काम नाही. आईपण फुलवण्या इतकच ते अवघड हि असत. नुसती एकत्र केलेली मजा नाही तर जेव्हा गरज वाटेल तेव्हा विश्वासान मांडीवर डोक टेकवाव अस ठिकाण. म्हणूनच तिनं ठरवलेलं आईशी मैत्री करायची. आई खूप छान होती. काळजी घेणारी हवं नको ते सगळ पाहणारी. "आई हे एक गाव असत घरातल्या घरात गजबजलेल गाव असत " हि फमुंची ओळ अगदी सार्थ ठरवणारी आई. पण तरीही ती आईच होती. मग आलीच बंधन आदराने वागा.. आदर आला मग अशा कितीतरी गोष्टी ज्या कधीच बोलता हि येत नाहीत. म्हणूनच आई पेक्षाही तिच्यातली मैत्रीण तिला हवी होती. कुणी एखादा मुलगा आवडला तर तिच्याशी सहज बोलता येईल अशी आई , सेक्स बद्दल वाटलंच काही तर ती समजून घेईलच अशी आई. आयुष्याच्या वाटेवर प्रेमात मैत्रीत झालाच कुठे दगाफटाका तर समजून घेईल अशी आई. मुलगी आहे म्हणून खाली पाहून न चालता ताठ मानेने चालायला शिकवणारी आई. जिच्या गळ्यात पडून प्रत्येक गोष्ट सांगता येइल अशी आई. नात्यांच्या व्याख्या कालानुरुप बदलायला हव्यात अस तिला खूप वाटत होत. कदाचित हे त्याच पाहिलं पाऊल होत. आईशी जोडायचं मैत्रीच नात.तिच्यातलं आईपण ठेऊन फुलवलेली मैत्री किती छान असेल. तिलाही तिच्या आयुष्यातले कितीतरी बंद कप्पे उघडता येतील.तिलाही मुलीपेक्षा जास्त छान असेल.तिलाही तिच्या आयुष्यातले कितीतरी बंद कप्पे उघडता येतील. मुलीपेक्षा जास्त छान तिलाही कोण समजून घेईल. मग मस्त तिच्या सोबत एखादी खडकवासल्याची ट्रिप प्लॅन करायची तिथ जाऊन तिलाच म्हणायचं आई भरना ग पैसे. मग छान भिजुन आलं कि तिच्याकडून चहा करुन घ्यायचा.डोक दाबून घ्यायचं.अनोळख्या स्पर्शाची भिती मग उरायचीच नाही. तिनच मग चिडवावं एखाद्या मुलावरुन खरचं आवडतो तुला तर मग प्रपोज करुन टाक. नाही म्हणाला तर मी आहे अस म्हणणारी. बेधुंद पणे जगणारी आईच्या बुरख्याखाली तिच्याही काही अपेक्षा अपुऱ्या रहिल्याच असतील ना.. तिलाही असतील काही अपेक्षा मग तिनेही सांगाव्यात . मग एक मैत्रीण म्हणून आपण त्या पूर्ण कराव्यात. आई म्हणून पाया पडायला लावणारी नव्हे तर एखादं मस्त झकास गाण लावून त्यावर आपल्या सोबत घरभर नाचणारी मैत्रीण मिळाली तर किती छान.. म्हणूनच तिनं ठरवलं आईशी मैत्री करायची पण सकाळपासून आई अजून उठलेलीच नव्हती. काल नाटक पाहून आल्यामुळे जरा उशीरच

झाला होता झोपायला. इतक्यात मागून कोणीतरी आलं आणि डोक्यावरुन हात फिरवत विचारलं. WILL YOU BE MY FRIEND. मागे पाहिलं तर आईच्या हातात स्वतःच विणलेलं एक फ्रेंडशिप बॅंड होत....

वाचक मित्रांनो

प्रत्येक भाषिकांचे काही स्वभाव असतात. उदाहरणार्थ गुजराथी म्हणजे व्यवसाय, पंजाबी म्हणजे शौर्य, बंगाली म्हणजे बंडखोरी, मारवाडी म्हणजे कंजूषी वगैरे वगैरे. निदान तसे ते ओळखले जातात.

तसा मराठी भाषिकांचा स्वभाव आहे "विचारी". मराठी माणूस विचार मांडणारा म्हणून ओळखला जातो. कधी नवे विचार मांडणारा. तर कधी जुने, लोकांनी टाकावू म्हणून टाकून दिलेले विचार पुन्हा नव्याने मांडणारा. सुधारकी किंवा सनातनी. डावे किंवा उजवे. किंवा मध्यम. खेळ किंवा कला. मराठी माणूस सर्वच आघाड्यांवर सर्वाधिक विचार करतो. सार्‍या संस्था, सारे पक्ष, सगळया संघटना यांचा जन्म महाराष्ट्रातच झाला. मग ते कॉंग्रेस असो, वा भाजप वा संघ वा कम्युनिस्ट, समाजवादी पक्ष असो की बहुजन समाज पक्ष. भारतातल्या प्रत्येक मोठ्या आणि महत्त्वाच्या पक्षाचा जन्म महाराष्ट्रात झाला आहे. सुधारकी कर्वे, आगरकर असो वा राष्ट्रवादी टिळक, सावरकर. कम्युनिस्ट डांगे रणदिवे असो वा हिंदुत्ववादी हेडगेवार गोळवलकर. आणि क्रांतिदूत कर्वे, कान्हेरे, चाफ़ेकर, राजगुरू, फ़डके असो वा शांतीदूत विनोबा, सानेगुरुजी. नव्या विचारांची वादळं आणणारे शाहू, फुले, आंबेडकर, अण्णा हजारे. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, नामदेव, एकनाथ. नावं तरी किती घ्यावीत. भारताच्या वैचारिक इतिहासातून महाराष्ट्राला कोणीच वगळू शकत नाही. सार्‍या विचारांचे जन्मस्थान महाराष्ट्रच आहे. सर्व तर्‍हेच्या विचारांचे मूळ... महाराष्ट्र.

हा केवळ योगायोग नाही. कारण महाराष्ट्राच्या मातीत आणि पाण्यात काही खासियत आहे. मुळा मुठा आणि गोदावरीच नव्हे तर कोयना, गोदावरी, कावेरीच्या पाण्यातून विचारांचे वादळ जन्माला घालण्याचे सामर्थ्य आहे. सह्याद्रीच्या कातळात बलदंड विचारांचे विशाल स्तंभ उभे करण्याची ताकद

आहे. एक काळ असा होता की जगातले विचारवंत पैठण (प्रतिष्ठान नगरी) येथे आपला नवा विचार घेऊन येत, व तेथील वादसभेत तो टिकला तर तसे प्रमाणपत्र मिळवीत. ही ताकद होती. आहे. असणार. ही ताकद आहे तुमच्या आमच्या मनात. तुमच्या आमच्या विचारांत.

चला तर या महाराष्ट्रभर पसरलेल्या या विचारांचे स्वागत करू या. वाचन करू या. लिहू या. नव्या वाचकांना या चळवळीत सामिल करू या. नवे लेखक घडवू या. नव्या विचारांना व्यासपीठ देऊ या. काही भव्य उभारू या! महाराष्ट्री जन्मास आल्याप्रमाणे... महादिव्य हातून काही घडवूया.

तुम्हीही बसल्या बसल्या खूप काही करू शकता. नवे विचार जाणून घेण्यासाठी नवीन लोकांना या महायज्ञात सामिल करू शकता. नवीन वाचकांचे ई मेल आयडी आम्हाला पाठवा. आपल्या आप्तेष्टांचे मित्रांचे ई मेल आय डी आम्हाला पाठवा. लग्नाच्या वेळी याद्या करता ना. तशा याद्याच करा. आपल्या आप्तेष्टांच्या. आणि त्यांना या भव्य चळवळीत सामिल करा. नवीन ई मेल्स esahity@gmail.com वर पाठवा. त्यांना नवनवीन पुस्तके मिळत रहातील. ई पुस्तके. फ्री पुस्तके. या ई मेल्सचा वापर इतर कोणत्याही कामासाठी केला जाणार नाही ही आमची हमी.

चलो सारे दुनिया को दिखाते हैं. मराठीमें क्या दम है!

हादरवूनच सोडू सगळ्यांना ! काय म्हणता?

